सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००

**वाचा :** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना २०२० /प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/१२९/२०२०**
**नाशिक दिनांक :-२१/०३/२०२०**

**<u>आदेश</u>**

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी नाशिक जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या औद्योगिक आस्थापनांना यापूर्वी गर्दी कमी करण्याबाबत वारंवार आवाहन केले आहे परंतु त्यास अपेक्षित असा प्रतिसाद अद्याप देखील मिळालेला नाही. या आस्थापनांमध्ये विविध कामगार व अन्य कर्मचारी अधिकारी हे वेगवेगळ्या भागातून प्रवास करून येत असल्यामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव होणे अधिक स्वभाविक झालेले आहे.

त्याअर्थी गुप्त अधिनियमातील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी सुरज मांढरे जिल्हाधिकारी नाशिक , करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

१. नाशिक जिल्ह्यामधील सर्व **औद्योगिक कारखाने, औद्योगिक संस्था ई** या **सारख्या आस्थापना ५०% कर्मचाऱ्याच्या सहाय्याने सुरू ठेवण्यात याव्यात**

२. सदर **आस्थापना / कारखाने / औद्योगिक संस्था** या ठिकाणी बाहेरच्या जिल्ह्यातून अथवा राज्यातून कोणतेही लोक कामासाठी येणार नाहीत अथवा भेटी देणार नाहीत

३. आस्थापनेवर येणाऱ्या सर्व कामगार/कर्मचारी/अधिकारी यांची सतत वैद्यकीय तपासणी करीत रहावे व त्यामध्ये कोणत्याही आजाराची लक्षणे दिसत असल्यास अशा व्यक्तींना तातडीने जनसंपर्क पासून विलग करून घरी विश्रांतीसाठी पाठवावे.

४. कामगार/कर्मचारी/अधिकारी यांना वेळोवेळी हात धुण्यासाठी सॅनीटायझर, हॅंडवॉश,जंतुनाशक अथवा साबण याची काटेकोरपणे व्यवस्था करावी.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(**सुरज मांढरे**, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रती -** १. साहाय्यक कामगार आयुक्त, नाशिक यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

二. प्रादेशिक अधिकारी , एम.आय.डी,सी. नाशिक आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

三. उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नाशिक

四. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

**प्रत-** १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
३. मा. पोलीस आयुक्त, शहर पोलीस , नाशिक माहितीस्तव सविनय सादर
४. पोलीस अधीक्षक, ग्रामीण पोलीस ,नाशिक माहितीसाठी